महत्त्वाचे

महाराष्ट्र शासन
कारागृह व सुधारसेवा विभाग
**अपर पोलीस महासंचालनालय व महानिरीक्षणालय,**
**कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य,**
दुसरा मजला, जुनी मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, पुणे-०१.
फोन क्र.: (०२०) २६१२४८१५/२६१२७९०६
E-mail ID- igoffice.hm-mh@gov.in

**पत्र**

जा.क्र./संशोधन विभाग/शिक्षक/बंदी व्यावसायीक शिक्षण-प्रशिक्षण/ 8750 /२०२४/कक्ष-९(क), पुणे-१, दि. 16.१०.२०२४

**विषय :- कारागृहातील बंदी शिक्षण/व्यावसायीक शिक्षण व प्रशिक्षणाबाबची माहिती सादर करणेबाबत**

संदर्भांकित विषयान्वये आपणास कळविणेत येते की, महाराष्ट्र कारागृह विभाग बंद्यांचे **'सुधारणा व पुनर्वसनाचे'** उद्दीष्ट सफलतेसाठी प्रयत्नशील आहे. या उपक्रमाचाच एक भाग म्हणून **यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक व महाराष्ट्र कारागृह विभाग** यांचेत कारागृहात विद्यापीठाचे शैक्षणिक उपक्रम राबविणेकरीता सामंज्यस्य करार दि. ५.०९.२०२४ रोजी करण्यात आला आहे.

त्याअनुषंगाने शैक्षणिक उपक्रमाचा कारागृहातील बंद्यांना लाभ घेता यावा व कारागृहातून बंदी बाहेर पडल्यानंतर त्यास उपजिविकेचे साधन उपलब्ध होण्याचे दृष्टिने सर्व कारागृह अधीक्षकांनी बंद्यांना यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ तसेच इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ यांच्या शैक्षणिक व व्यावसायीक अभ्यासक्रमाबाबतची विद्यापीठ प्रतिनिधी किंवा विद्यापीठाचे अधीकृत Website द्वारे माहिती प्राप्त करुन घ्यावी व कोणत्या प्रशिक्षणास/अभ्यासक्रमास प्रवेश घेण्यास ते इच्छुक आहेत, याबाबतची माहिती घेवून ८ दिवसात त्याबबतचा अहवाल सोबत दिलेल्या विहित नमुन्यात विभागीय कार्यालयामार्फत सादर करावा. विभागीय कार्यालयांनी आपले विभागातील सर्व कारागृहाचा संकलित अहवाल (Unicode-DVOT-SurekhMR) या Format मध्ये Soft Copy मध्ये igoffice.hm-mh@gov.in/igoffice.ro-mh@gov.in या Mail द्वारे सादर करण्यात यावा.

**सोबत:- शै. माहिती विहित नमुना**

16/10/24

**(प्रशांत बुरडे)**
अपर पोलीस महासंचालक व
महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा,
महाराष्ट्र राज्य, पुणे-०१

**प्रती,**

१. विशेष पोलीस महानिरीक्षक, छ. संभाजी नगर/ नाशिक विभाग
२.कारागृह उपमहानिरीक्षक, पश्चिम विभाग/पूर्व विभाग/ दक्षिण विभाग
३.अधीक्षक, मध्यवर्ती/जिल्हा/खुले/विशेष कारागृह

Acer E- YCMOU

| बंद्यांकडून, त्यांना आवश्यक वाटणा-या अभ्यासक्रम / प्रशिक्षणाची यादी | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे / प्रशिक्षणाचे नाव | अभ्यासक्रम / प्रशिक्षण देणा-या संस्थेचे नाव | अभ्यासक्रम/ प्रशिक्षण कालावधी | शेरा |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |